*Annexure IX (46), (Vide Article - 9.02 (ix))*

महाराष्ट्र शासन,
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय, क्र. डब्ल्यूएलपी-१०९७/प्र.क्र. ११०/फ-१,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक : २६ मार्च, १९९९

वाचा : १] शासन निर्णय, क्र. डब्ल्यूएलपी- १०९७/प्र.क्र. ११०/फ-१,
दिनांक १८.५.१९९८,
२] शासन शुद्धीपत्रक क्र. डब्ल्यूएलपी-१०९७/प्र.क्र. ११७/फ-१,
दिनांक १०.९.१९९८,
३] मुख्य वनसंरक्षक [ वन्यजीव ], म.रा. नागपूर यांचे पत्र क्र. कक्ष-२३[अ]
[३]/प्र.क्र. १/भाग-२/६६३, दि. ५ जून, १९९८.

शासन निर्णय :

राष्ट्रीय उद्याने व अभयारण्याच्या व्यवस्थापन आराखडयास मंजुरी देण्यासाठी मुख्य वन्यजीव रक्षक महाराष्ट्र राज्य यांना दि. १८.५.१९९८ च्या शासन निर्णयाद्वारे प्राधिकृत करण्यात आले होते. यातील अट क्र. १ : " व्यवस्थापन आराखडयास मंजुरी देण्यापूर्वी मुख्य वन्यजीव रक्षक, महाराष्ट्र राज्य, सदर आराखडा मुख्य वनसंरक्षक [ सर्व ] यांच्या बैठकीत तसेच, राज्य वन्यजीव सल्लागार मंडळाच्या बैठकीत मांडून त्यांची सहमती घेतील. "ही अट रद्द करून त्याऐवजी पुढील अट घालण्यात येत आहे.

" व्यवस्थापन आराखडयास मंजुरी देण्यापूर्वी सदर आराखडा मुख्य वनसंरक्षक [ सर्व] यांच्या बैठकीत मांडून त्यांची सहमती घेतील"

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

[ कों. मा. ठाकूर ]
अवर सचिव, महसूल व वन विभाग.

. २. .